CMYK

लागवडीखालील पोटखराब जमिनीची नोंद ॲग्रिस्टॅक योजनेत होणार ! >> पान 2

शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयातील तासिका तत्त्वावरील अधिव्याख्यात्यांचे मानधन देण्यात यावे >> पान 3

कोट्यवधी रुपयाचे काम अर्धवट : अंजनीवासीयांना पाणी टंचाईची चटके कायम >> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

**सुविचार**

थोडे थोडे पण सतत केलेले कामच फलदायी ठरते.

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



एका सीनमुळे ऐश्वर्याने रिजेक्ट केला सिनेमा, तरीही ठरला ब्लॉकबस्टर

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 182 ■ बुधवार, दि. 12 फेब्रुवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# सामूहिक कॉपी आढळल्यास केंद्राची मान्यता रद्द करा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आदेश



फाईल फोटो

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी : दहावी बारावी परीक्षेत सामूहिक कॉपी करण्याचे प्रकार ज्या केंद्रावर उघडकीस येतील त्या केंद्राची मान्यता कायमस्वरूपी रद्द केली जावी. तसेच जे शिक्षक आणि कर्मचारी कॉपी करण्यासाठी मदत करतील त्यांना बडतर्फ करा, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले.**

**दहावी, बारावी परीक्षेच्या तयारीचा घेतला आढावा**

**------------**

**बुलढाण्यात बारावीच्या ३४,६३५ विद्यार्थ्यांची परीक्षा ; ११६ परीक्षा केंद्र**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, पोलीस अधिकारी यांच्याशी परीक्षेच्या तयारी बाबत आणि कार्यवाही करण्याबाबत संवाद साधला. त्यावेळी त्यांनी हे आदेश दिले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मंत्री उपस्थित होते. तसेच बुलढाण्यातून प्र.जिल्हाधिकारी सदाशीव शेलार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी बी.एम. मोहन, अपर पोलीस अधीक्षक बी.बी. महामुनी आदी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

इयत्ता बारावीची परीक्षा आजपासून १८ मार्चपर्यंत कालावधीत ३,३७३ परीक्षा केंद्रावर होणार आहे. दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च कालावधीत ५,१३० परीक्षा केंद्रावर होणार आहे. यासाठी सर्व तयारी पूर्ण केली असल्याचे माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली.

**कॉपीमुक्त परीक्षेची अंमलबजावणी**

यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परीक्षा केंद्र परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६३ ची कडक अंमलबजावणी करण्यात यावी, परीक्षा केंद्रावर व १०० मीटर परिसरात अनाधिकृत व्यक्तींना पूर्णत: प्रतिबंध करण्यात यावा, परीक्षा केंद्रात प्रवेश देतांना विद्यार्थी कोणत्याही प्रकारचे कॉपी करण्याचे साहित्य (पुस्तके, नोटस्, मोबाईल इ.) जवळ बाळगणार नाहीत याची खबरदारी घ्यावी , भरारी पथकाव्दारे कॉपी मुक्त परीक्षेची प्रभावी



अंमलबजावणी अपेक्षीत आहे, अशा सूचना दिल्या.

**विशेष बैठ्या पथकांची नियुक्ती होणार**

सर्व परीक्षा केंद्रावर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत विशेष बैठ्या पथकाची नियुक्ती करण्यात यावी, बैठया पथकाने परिक्षा सुरु होण्यापूर्वी एक तास परिक्षा केंद्रावर पोहोचावे व परिक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिका कस्टोडियनकडे जमा करेपर्यंत नियंत्रण ठेवावे,संवेदनशील केंद्रांवर कार्यक्षम व वरिष्ठ अधिका-यांची बैठया पथकात नेमणूक करावी. असेही त्यांनी सांगितले.

**संवेदनशील केंद्रावर ड्रोनची नजर**

संवेदनशील परिक्षा केंद्रांवर ड्रोन कॅमेराव्दारे आणि व्हिडीओ कॅमेराव्दारे पूर्णवेळ निगराणी करावी, सर्व तालुक्यातील परिक्षा केंद्रांवर पुरेसा बंदोबस्त, बैठी पथके, ड्रोन व व्हिडीओ कॅमेरे कार्यरत असावेत यावर निगराणी ठेवण्याकरिता जिल्हाधिका-यांनी प्रत्येक तालुक्याकरिता एक विभाग-प्रमुख,

>> पान २

## अनुसूचित जाती मुलींच्या निवासी शाळेच्या मुख्याध्यापिका ६० हजार रुपयांची लाच घेताना एसीबीच्या जाळ्यात



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाण्याच्या शेगाव येथील अनुसूचित जाती मुलींची निवासी शाळा येथील मुख्याध्यापिका सीमा वनकर यांच्याकडून सदर शाळेमध्ये विद्यार्थ्यांना भोजन व्यवस्था करणाऱ्या महिला कंत्राटदाराकडून अहवाल देण्यासाठी २ लाख रुपयांची मागणी केली होती. त्यापैकी तडजोडीअंती दोन महिन्याचे ६० हजार रुपये लाच स्वीकारताना मुख्याध्यापिका सीमा वनकर यांना आज मंगळवारी सायंकाळी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात अटक केली आहे. या कारवाईमध्ये प्रामुख्याने तक्रारकर्ता महिला, आरोपी महिला आणि कारवाई करणाऱ्या लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकारी देखील महिला असल्याचा योगायोग पाहायला मिळाला आहे.

## कल्याण लोकलमध्ये मोबाईलचा स्फोट!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईची जीवनवाहिनी असलेल्या लोकलमध्ये धक्कादायक घटना घडली आहे. कल्याणकडे जाणाऱ्या लोकलमध्ये मोबाईलचा स्फोट झाल्यामुळे आग लागली असल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेत कोणतीही जीवित हानी झाली नसून मोटरमनच्या प्रसंगावधानतेमुळे अनेक प्रवाशांचे प्राण वाचले.

मिळालेल्या माहितीनुसार सोमवारी ( दि १० ) रात्री साडे आठच्या सुमारास सीएसएमटी वरून कल्याणच्या दिशेने जाणाऱ्या लोकल डब्ब्यात एका महिलेच्या पर्समधील फोनचा स्फोट झाला. या स्फोटात कोणीही जखमी झालेली नाही. ही घटना कळवा स्थानकात घडली. या घटनेने ट्रेनमध्ये एकच गोंधळ उडाला. परंतु मोटरमनच्या केबिनमधील गार्डने प्रसंगावधान राखत अग्निरोधकाच्या सहाय्याने आग आटोक्यात आणली. दरम्यान मोबाईलचा स्फोट कसा झाला याचा पोलीस तपास करत आहेत.

## कुंभमेळ्याहून परतताना बसची ट्रकला जोरदार धडक

**जबलपूर:** महाकुंभमेळ्याहून परतताना भाविकांच्या बसचा भीषण अपघात झाल्याची बातमी समोर आली आहे. मध्यप्रदेशातील जबलपूरमधील सिहोराजवळ बस आणि ट्रकची समोरासमोर जोरदार धडक झाली. या धडकेत बसचा चक्काचूर झाला असून ७ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर अनेक प्रवासी जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, आज सकाळी ९ वाजून १५ मिनिटांच्या सुमारास राष्ट्रीय महामार्ग ३०वर हा अपघात झाला. कुंभमेळ्याहून परतलेल्या भाविकांची बस बर्गी गावादरम्यान पोहोचताच समोरून येणाऱ्या ट्रकला धडक दिली. अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी प्रशासन आणि पोलिसांचे पथक दाखल झाले असून ताताडीने बचावकार्य सुरु करण्यात आले. तर बसमध्ये अजूनही काही प्रवासी अडकल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या घटनेवेळी बघ्यांची मोठी गर्दी जमली होती. सिमेंटने भरलेला एक ट्रक विरुद्ध दिशेने येत असल्यामुळे हा अपघात घडल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

दरम्यान, या घटनेचा व्हिडीओ देखील समोर आला आहे. त्यामध्ये बसच्या काही भागाचे तुकडे झाल्याचे दिसत आहे. तसेच स्थानिक लोक ट्रकच्या छतावर चढून प्रवांशाची मदत करत आहेत. घटनास्थळी क्रेन देखील पोहोचली आहे. या अपघातात आणखी कुणी बसमध्ये अडकले आहेत का? याचा तपास सुरू आहे.

## महिलेचा खून करून पळालेल्या मारेकऱ्याच्या मुसक्या २ तासात आवळल्या

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईत एक धक्कादायक घटना घडली आहे. वांद्रे परिसरात सैफ अली खानवरील हल्ल्यानंतर आता वांद्र्यातच ज्येष्ठ महिलेची निर्घृणपणे हत्या केल्याचे उघडकीस आले आहे. या महिलेचे हात बांधून तिच्या गळ्यावर धारदार शस्त्राने वार करण्यात आले आहेत. मात्र सीसीटीव्ही फुटेज सापडल्याने पोलिसांनी तपास करत मारेकऱ्याच्या मुसक्या अवघ्या २ तासात आवळल्या आहे. असे असले तरी या हत्येच्या घटनेने वांद्रे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईतील वांद्रे येथील रिक्लेमेशन परिसरातील इमारतीत राहणाऱ्या ६४ वर्षीय रेखा खोंडेंची निर्घृणपणे हत्या करण्यात आली आहे. मारेकऱ्याने रेखा खोंडेंचे हात बांधून त्यांच्या गळ्यावर धारदार शस्त्राने वार केले. रेखा यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी भाभा रुग्णालयात पाठवला आहे.

## रायगड डीपीडीसी बैठकीचे निमंत्रण नसल्याने शिवसेनेच्या आमदारांचा संताप, एकनाथ शिंदेंची पहिली प्रतिक्रिया

दैनिक आपला विदर्भ

**रायगड/प्रतिनिधी :** रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाचा वाद महायुतीत अजूनही कायम आहे. त्यातच आज मंगळवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दालनात रायगड जिल्ह्याची डीपीडीसी बैठक पार पडली. या बैठकीत राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या मंत्री अदिती तटकरे यांनी हजेरी लावली होती. मात्र, या बैठकीला रायगड जिल्ह्यातील शिवसेनेचे मंत्री भरत गोगावले गैरहजर होते. तर शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवी आणि महेंद्र थोरवे यांनी आम्हाला या बैठकीचे निमंत्रणच देण्यात आले नव्हते, असा दावा करत संताप व्यक्त केला. आता यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

शिवसेनेचे आमदार महेंद्र थोरवे आणि महेंद्र दळवी यांनी डीपीडीसी बैठकीचं निमंत्रण न मिळाल्याने संताप व्यक्त करताच अजित पवारांच्या कार्यालयाकडून याबाबत स्पष्टीकरण देण्यात आले. नाशिक आणि रायगड जिल्ह्याला पालकमंत्री नाहीत म्हणून आम्ही केवळ मंत्र्यांना बैठकीसाठी बोलावले. रायगडचे मंत्री म्हणून अदिती तटकरे आणि भरत गोगावले यांना निमंत्रण देण्यात आलं होतं. मात्र भरत गोगावले बैठकीसाठी आले नाहीत. नाशिकच्या वार्षिक जिल्हा नियोजन बैठकीसाठी दुपारी मंत्री गिरीश महाजन, मंत्री दादा भुसे, माणिकराव कोकाटे आणि नरहरी झिरवाळ यांना निमंत्रण देण्यात आले आहे, अशी माहिती अजित पवार यांच्या कार्यालयाकडून देण्यात आली.



**काय म्हणाले एकनाथ शिंदे?**

याबाबत एकनाथ शिंदे यांना विचारले असता एकनाथ शिंदे म्हणाले की, ठीक आहे. आमदारांनी त्यांच्या भागातील ज्या काही सूचना असतील, त्या त्यांनी द्यावात. त्या मी, देवेंद्र फडणवीस आणि अजित दादा हे अर्थसंकल्पात घेऊ, असे त्यांनी म्हटले. तर आज रायगडच्या जिल्हा नियोजनासंदर्भात बैठक झाली. पालकमंत्र्यांचा वाद देखील लवकर मिटेल, असे देखील एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

**मुंबई आणि ठाणे जिल्ह्यासाठी निधीची मागणी**

दरम्यान, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या मुंबईच्या वार्षिक जिल्हा नियोजणासाठी बैठकीसाठी पार पडली. याबाबत विचारले असता एकनाथ शिंदे म्हणाले की, अनेक विषयांवर चर्चा झाली. मुंबई शहर ही आपली आर्थिक राजधानी. तिथे जगभरातून लोक येतात. मुंबईची जिल्हा नियोजनाची मी याआधी बैठक घेतली तेव्हा आमदारांनी काही सूचना केल्या होत्या. त्या सूचनाप्रमाणे मुंबईतले हॉस्पिटल, उद्यान, रस्ते त्याचबरोबर नवीन प्रकल्प संदर्भात चर्चा करण्यात आली होती. मुंबई आणि ठाणे जिल्ह्यासाठी आवश्यक तो निधी ठेवण्याची मागणी मी अर्थमंत्री अजित पवार यांच्याकडे केल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. तसेच ठाणे जिल्हा देखील मोठा जिल्हा आहे. ठाणे जिल्ह्यासाठी देखील निधीची मागणी केल्याची माहिती एकनाथ शिंदे यांनी दिली.

## साई संस्थान कर्मचारी हत्या प्रकरण; अन् 'त्या' फ्लेक्स बोर्डवर वडिलांचा फोटो पाहून चिमुकली ढसाढसा रडली

**शिर्डी/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपूर्वी शिर्डी साईबाबा संस्थानमधील सुभाष घोडे आणि नितीन शेजूळ या दोन कर्मचाऱ्यांची निर्घृण हत्या करण्यात आली होती. नितीन शेजुळ अन् सुभाष घोडे हे सुरक्षा कर्मचारी ड्युटी संपवून घरी निघाले होते. तर कृष्णा देहरकर हे मुलाला सोडून घरी निघाले होते. त्यांच्यावर अत्यंत प्राणघातक हल्ला झाला. मोटारसायकलवर असलेल्या दोघांनी चोरीच्या उद्देशाने तिघांना वेगवेगळ्या वेळेत अडवून त्यांच्याकडील रक्कम हिसकावून घेतली होती. इतक्यावरच न थांबता विकृत मनोवृत्तीतून आरोपींनी या तिन्ही निरपराध नागरिकांवर चाकूने असंख्य वार केलेत. यात दोघांचा जागेवरच मृत्यू झाला. तर एक ग्रामस्थ गंभीर जखमी झाले. ही हल्ल्याची घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे.

गुन्हेगारी रोखण्यासाठी शिर्डी ग्रामसभा : या घटनेचा निषेध करण्यासाठी आणि शिर्डीत वाढत असलेली गुन्हेगारी रोखण्यासाठी शिर्डी ग्रामस्थांनी सोमवारी शिर्डीत निषेध ग्रामसभा आयोजित केली होती. या ग्रामसभेला ग्रामस्थांसह मृतांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामसभेला सुरुवात करण्याआधी शिर्डी ग्रामस्थांनी शहरातून मशाल मोर्चा काढलाय. यावेळी मृत घोडे आणि शेजूळ यांच्या मुलींनी मशाल हातात घेऊन आरोपींचा एन्काऊंटर करा, अशा मागणीच्या घोषणा देत हा मशाल मोर्चा साईबाबांच्या द्वारकामाईसमोरील खुल्या नाट्यगृह मैदानावर पोहोचला.

...अन् शेजूळ यांची चिमुकली मुलगी गौरी ढसाढसा रडली : दरम्यान, यावेळी येथे लावण्यात आलेल्या फ्लेक्स बोर्डावरील वडिलांच्या फोटोवर नजर पडताच मृत नितीन शेजूळ यांची चिमुकली मुलगी गौरी ढसाढसा रडू लागली, ते पाहून पाहून शिर्डी नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष निलेश कोतेंनाही अश्रू अनावर झालेत. ''रडू नको बाळा'' आम्ही तुझ्यासोबत आहेत, असे म्हणत कोते यांनी गौरीला जवळ घेत तिची समजूत काढली. यावेळी उपस्थित अनेक ग्रामस्थांचे डोळेही पाणावले. निषेध ग्रामसभेच्या सुरुवातीलाच गौरीच्या अश्रूंनी आणि आक्रोशाने वातावरण हळवे झाले.

## जितेंद्र आव्हाडांना फक्त रॉकेल टाकून पेटवायचाच धंदा जमतो का?

### सुरेश धसांचा हल्लाबोल, म्हणाले, त्यांना पोटशूळ उठलाय

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाची बाजू मी जशी मांडली, तेवढ्याच प्रखरतेने सोमनाथ सुर्यवंशी प्रकरणातही बाजू मांडल्याचे मत भाजप आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केले. सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणात संबधित पोलिसांना रिमू फ्रॉम सर्विस करा अशी मागणी देखील मीच केल्याचे सुरेश धस म्हणाले. आमदार जितेंद्र आव्हाड यांना फक्त रॉकेल टाकून पेटवायचाच धंदा जमतो का? अशी टीका देखील धस यांनी केली. प्रकरण तिथल्या तिथे मिटलं त्यामुळं त्यांना पोटशूळ उठल्याचे धस म्हणाले.

सर्व मोर्चात मी दोन्ही बाजूने सारखाच बोललो असल्याचे धस म्हणाले. मोर्चेकरांच्या संमतीनं मोर्चा मिटवणं योग्य की अयोग्य? असेही धस म्हणाले. जितेंद्र आव्हाड यांना फक्त रॉकेल टाकवून पेटवायचाच धंदा जमतो का? महाराष्ट्राचं सामाजिक स्वास्थ नीट राहिलं न पाहिजे का? असेही धस म्हणाले. सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणात मुंबईला येणारा लाँग मार्च नाशिकमध्ये थांबवल्यानं जितेंद्र आव्हाडांना पोटशूळ उठलाय का? असा सवाल देखील धस यांनी केला. आम्हीही फुले शाहू आंबेडकर विचारांचे आहोत असेही ते म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणात न्यायालयीन चौकशीचे आदेश दिले आहेत. माझं वाक्य मोडून तोडून दाखवण्यात आलं आहे. मी म्हटलं होतं व्हिडिओत दिसत असलेल्यांवर कारवाई करा असेही धस म्हणाले.

**जितेंद्र आव्हाड मोर्चात होते पण ते सोमनाथ सूर्यवंशीवर बोललेही नाहीत**

जितेंद्र आव्हाड मोर्चात होते पण ते सोमनाथवर बोललेही नाहीत असेही सुरेश धस म्हणाले. धाराशिवला आले नाहीत फक्त बीडला आले. मी पहिल्या दिवसांपासून मोर्चेकऱ्यांच्या संपर्कात होतो. आम्ही दररोज विनंती करत होतो क्लेशकारक आंदोलन थांबवा. यात न्यायालयीन चौकशी लावलेली आहे असेही धस म्हणाले. आव्हाड यांना आवाहन आहे की, दोन्ही प्रकरणात जराही काही वाटत असेल तर ठाण्यात किंवा मुंबईत लाखोचा मोर्चा काढा असेही धस म्हणाले. आव्हाड अक्षय शिंदेंच्या प्रकरणात गुणगाण गात होते. धाराशिवच्या नितीन बिक्कड याने त्यांना मदत केली, मोबाइल सोडून पळाले, विष्णू चाटे वेगळ्या पद्धतीने पळून गेला. बीड एसआयटी व परभणीचा तपास योग्य पद्धतीने सुरु आहे.

महादेव मुंडे प्रकरणात पहिल्या १५ दिवस तपासचे झाला नाही. या चौकशीनंतर १२ ते १५ लोके फरार आहेत असेही धस म्हणाले.

**नेमके काय म्हणाले होते जितेंद्र आव्हाड?**

सुरेश धस यांनी परभणी लाँग मार्चमध्ये बोलताना, मोठं मन करा आणि पोलिसांना माफ करा असे वक्तव्य केले होते. त्यावर राष्ट्र्वादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी जोरदार टीका केली.



आव्हाडांनी सुरेश धसांचा व्हिडीओ शेअर केला आणि सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मारेकऱ्यांना माफ करा असं तुम्ही कसं म्हणू शकता असा प्रश्न विचारला होता.

CMYK

# लागवडीखालील पोटखराब जमिनीची नोंद ॲग्रिस्टॅक योजनेत होणार !

## कोणतीही बाधा नाही ; शेतकऱ्यांनी फार्मर आयडी तयार करुन घ्यावा- जिल्हा प्रशासनाचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** :शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीकोनातून ॲग्रिस्टॅक योजनेअंतर्गत शेतकरी माहिती संच व त्यांचे शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) तयार करण्यात येत आहेत. या योजनेत शेतकऱ्यांना लागवडीखालील पोटखराब क्षेत्र समाविष्ठ करता येणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी तात्काळ संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी यांना संपर्क साधून सातबारा वरील पोटखराब वर्ग अ क्षेत्र हे लागवडीखालील क्षेत्रात रूपांतरित करण्यासाठी विहित प्रक्रिया पार पाडून लागवडी खालील क्षेत्र वाढवण्यात येईल तरी आपण मोठ्या संख्येने फार्मर आयडी तयार करून घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.



ॲग्रिस्टॅकमधील फार्मर आयडी हा लागवडी योग्य क्षेत्राकरिता बनविण्यात येत असल्याने ज्या शेतकऱ्यांनी पोटखराब क्षेत्र लागवडीखाली आणले परंतू साताबारावर नोंद नाही अशा प्रकरणी तलाठी व मंडळ अधिकारी यांच्यामार्फत विहित प्रक्रिया पार पाडून ई-फेरफार प्रणालीव्दारे पोटखराब वर्ग अ क्षेत्र सातबारावर लागवडीखालील क्षेत्रात रूपांतर केले जाईल. या रूपातंरित क्षेत्रामुळे ॲग्रिस्टॅकमधील फार्मर आयडीमध्ये दर्शविलेल्या लागवडीखालील क्षेत्रामध्ये आपोआप वाढ होईल. तसेच भविष्यात होणारे जमीन हस्तांतरणाचे व्यवहार देखील फार्मर आयडीशी आपोआप लिंक होणार आहेत. सर्व शेतकरी बांधवांनी फार्मर आयडी बनवत असतांना आपले कोणत्याही प्रकारे सातबारावरील क्षेत्र कमी दाखविले जाणार नाही याची दक्षता घेवून शेतकऱ्यांनी लवकरात लवकर आपला फार्मर आयडी जवळच्या जन सेवा केंद्र (सीएससी) येथे जावून तयार करून घ्यावा.

**अद्ययावतीकरण चालू राहणार**

ॲग्रिस्टॅक योजनेअंतर्गत फार्मर आयडीमध्ये पोटखराब खालील लागवडीची जमीन अथवा ७/१२ मधील अन्य बदल दर्शविण्याची प्रक्रिया व अद्ययावतीकरण निरंतरपणे चालू राहणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी सद्यस्थितीत जवळच्या जन सेवा केंद्र (सीएससी) येथे जावून फार्मर आयडी तयार करून घ्यावा.

**योजनांच्या लाभ वितरणात येणार सुलभता**

सदर ॲग्रिस्टॅक योजनेंतर्गत शेतकऱ्यांना विविध सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी कृषि व संलग्न विभागांना शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेताचा आधार संलग्न माहिती संच (फार्मर रजिस्ट्री) तयार करण्यात येत असून उपलब्ध आकडेवारीच्या आधारे शेतकरी बांधवांना विविध योजनांचा लाभ वितरित करण्यामध्ये सुलभता येणार आहे. तसेच लाभार्थ्यांना वारंवार प्रमाणिकरण अर्थात ई-केवायसीची आवश्यकता राहणार नाही.

**फार्मर आयडी नाही तर लाभ मिळणार नाही**

ॲग्रिस्टॅक योजनेअंतर्गत शेतकऱ्यांनी आपला सातबारा आधारला लिंक करुन फार्मर आयडी तयार करुन घ्यायचा आहे. फार्मर आयडी बनवला नाही तर पीक विमा, पीक कर्ज. पीएम किसान व विविध पीक अनुदान यांचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे तात्काळ न चुकता कोणाचीही वाट न पाहता विनाविलंब शेतकऱ्यांनी आधार आयडी क्रमांक ग्रिस्टॅक प्रणालीवर नोंद करावी.

**नोंदणी करा**

ॲग्रिस्टॅक योजनेअंतर्गत फार्मर आयडी नोंदणीकरिता शेतकऱ्यांनी जवळच्या जन सेवा केंद्र (सीएससी) अथवा तलाठी, मंडळ अधिकारी अथवा तहसिलदार यांना संर्पक करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# शेतकऱ्यांना फार्मर आयडी व इतर प्रमाणपत्राचे तहसीलदार निलेश मडके यांच्या हस्ते वितरण






दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या महसूल,पुनर्वसन विभागाच्या माध्यमातून 'फार्मर आयडी' व विविध प्रमाणपत्रांचे वितरण शिबिर आयोजित करण्यात आले आहे. त्यानुषंगाने शेलगाव देशमुख येथे ११ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजता उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार नीलेश मडके यांच्या हस्ते शेतकऱ्यांना फार्मर आयडी व इतर प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

यावेळी माजी पंचायत समिती सभापती दिलीप देशमुख,सरपंच किरणताई दिलीप आखरे, निरीक्षण अधिकारी एन.बोरोडे,मंडळ अधिकारी आर.चनखोरे, एकनाथ खराट, महसूल अधिकारी बालाजी तिरके,गणेश ढोले,राजु धाडवे,आळणे,विलास कड्डुक, ग्रामपंचायत अधिकारी डि.पी काळे, दिलीप आखरे, प्रल्हाद गोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन महसूल अधिकारी संदीप पवार यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ग्रामपंचायत कर्मचारी माधव कड्डुक, विष्णु आखरे, विलास काळदाते, गजानन खोडवे, महसूल शेवक किशोर पातुरकर, भगवान बघे,अनिल सिरसकर,संजय खिल्लारे,कृषी सहाय्यक हर्षदा राहिंज सह महसूल विभाग, आरोग्य विभाग,संजय गांधी विभाग,राशन दुकानदार,आशा सेविका व सेतू चालक यांची परिक्षम घेतले.यावेळी शेलगाव देशमुख, पांगर खेड,जनुना,विश्रवी,कनका,राजगड,जिंजाळा, विठ्ठलवाडी व बेलगाव येथील शेतकरी व नागरिक उपस्थित होते.

## एका सीनमुळे ऐश्वर्याने रिजेक्ट केला सिनेमा, तरीही ठरला ब्लॉकबस्टर

**मुंबई/प्रतिनिधी :**बॉलिवूडमध्ये अनेक ब्लॉकबस्टर सिनेमे आहेत जे प्रेक्षकांच्या मनात घर करून आहेत. अशातच लेडी स्टार ऐश्वर्या रायचे तर अनेक हिट सिनेमाची लिस्ट आहे. मात्र असेही काही सुपरहिट सिनेमे आहेत ज्यांची ऑफर ऐश्श्वर्याने नाकारली. ऐश्वर्या रायने तिच्या कारकिर्दीत अनेक हिट चित्रपट केले आहेत. त्याने तिच्या कारकिर्दीत अनेक चित्रपट नाकारले आहेत. एकदा तर त्याने बॉक्स ऑफिसवर कमाईच्या बाबतीत धुमाकूळ घालणारा एक चित्रपटही नाकारला होता.ऐश्वर्या राय ही अशा निवडक स्टार्समध्ये एक आहे जिने बॉलिवूड आणि हॉलिवूड दोन्ही ठिकाणी काम केलं आहे. आतापर्यंत तिने अनेक हॉलिवूड चित्रपटांमध्ये अनेक मोठ्या स्टार्ससोबत स्क्रीन शेअर केली आहे. पण फक्त एका सीनमुळे तिने एका रेकॉर्डब्रेक चित्रपटाची ऑफर नाकारली. ऐश्र्वर्या राय अभिनयाच्या जगात तिच्या कामासाठी तसेच तिच्या अनोख्या शैलीसाठी ओळखली जाते. ती अनेकदा चांगल्या कंटेंट असलेल्या चित्रपटांमध्ये काम करते.

## उत्क्रांती वादाचा जनक : चार्ल्स डार्विन

उत्क्रांती वादाचा जनक असे ज्यांना समजले जाते त्या चार्ल्स रॉबर्ट डार्विन यांचा आज जन्मदिन. चार्ल्स डार्विन हे विख्यात जीवशास्त्रज्ञ होते. त्यांनी मांडलेल्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांतात जगातील जीवसृष्टीची उत्पत्ती व विकासाची कशी प्रगती होत गेली हे शास्त्रशुद्धरित्या उलगडून दाखवले. चार्ल्स डार्विन यांचा जन्म १२ फेब्रुवारी १८०९ रोजी इंग्लंडमधील श्रॉपशायर परगण्यात झाला.त्यांचे वडील रॉबर्ट डॉक्टर तर आजोबा इमर्सन शास्त्रज्ञ होते. शालेय जीवनात त्यांना रसायन शास्त्राची खूप आवड होती म्हणून आपल्या भावाच्या मदतीने त्यांनी आपल्या घराबाहेर एक छोटीशी प्रयोगशाळा उभारली होती तिथे ते तासनतास प्रयोग करीत बसत. ते असे एकाच जागेवर तासनतास प्रयोग करीत बसत असल्याने मित्र मंडळी त्यांची नेहमी टर उडवत पण ते त्याकडे कायम दुर्लक्ष करीत. त्यांना निसर्गाचीही खूप आवड होती. पुढे त्यांची डॉ ग्रांट यांच्याशी ओळख झाली. डॉ ग्रांट हे स्वतः प्रसिद्ध जीव शास्त्रज्ञ होते. १८२५ मध्ये डार्विन यांनी केंब्रिज विद्यापीठाच्या क्राईस्ट महाविद्यालयात नाव नोंदवून पदवी मिळवली. तिथे त्यांना कीटक व निसर्गातील जीव जिवाणूंच्या निरीक्षणाचा नाद लागला. १८२६ मध्ये कॅप्टन किंगने दक्षिण अमेरिका संशोधनाची मोहीम आखली त्यात ते सहभागी झाले. त्या मोहिमेवर ते पाच वर्ष होते. तिथे त्यांनी निरनिराळे पक्षी, प्राणी, कीटक, जीवजंतू एकमेकांशी कसे वागतात. ते एकमेकांशी आणि निसर्गाशी कसे जुळवून घेतात याचे निरीक्षण व अभ्यास केला व तेथे उत्क्रांतीवाद, सहजीवन, बळी तो कान पिळी ही मूलभूत नैसर्गिक तत्वे ते शिकले. याच दरम्यान माणसाचा मूळ पुरुष, चार पायी माकडपासून झाला असला पाहिजे असा विचार त्यांच्या डोक्यात घुमू लागला. त्यांनी याचे खूप संशोधन केले. वेगवेगळे प्राणी कसे निर्माण झाले यासंदर्भातही त्यांनी खूप संशोधन केले. या संशोधनावर आधारित ओरिजन ऑफ स्पेसिस हा ग्रंथ त्यांनी लिहिला. या ग्रंथातच त्यांनी उत्क्रांतवादाचा सिद्धांत मांडला आहे. या ग्रंथाच्या १२५० प्रति एकाच दिवसात विकल्या गेल्या. या ग्रंथामुळे त्यांचे सर्वत्र त्यांचे नाव झाले. या ग्रंथात त्यांनी मांडलेला उत्क्रांतीवादाचा सिध्दांत बायबलच्या विरुद्ध जात होता म्हणून अनेकांनी या सिद्धांताला विरोध केला. हा सिद्धांत बायबलच्या विरुद्ध जातो म्हणून त्याचा निषेध करण्यासाठी १८६० मध्ये ऑक्सफर्डमध्ये विलबर फोर्स या बिशपने सभा बोलावली. डार्विन यांचा एकीकडे पुरोगामी विचारांचे लोक समर्थन करीत होते दुसरीकडे प्रतिगामी लोक विरोध करीत होते. पण या सर्व घडामोडींचा डार्विन यांच्यावर कोणताही परिणाम होत नव्हता त्यांचे संशोधन चालूच होते. बिशप डार्विनला कडाडून विरोध करीत असताना हक्सले डी हुकर हे शास्त्रज्ञ मात्र डार्विन यांची बाजू सडेतोड व सोदाहरण मांडत होते. त्यामुळे उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताला कडाडून विरोध करणाऱ्या बिशपला अखेर माघार घेऊन डार्विनचा सिद्धांत मान्य करावाच लागला.

## कार विहिरीत कोसळल्यामुळे ३ तरुणांचा बुडून मृत्यू, दोन सख्ख्या भावांचा समावेश

**नागपूर/प्रतिनिधी :** भरधाव कार अचानक विहिरीत कोसळल्यामुळे तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना नागपूरच्या बुटीबोरी येथे घडलीय. मृत तीन तरुणांपैकी एक तरुण हा कार चालवणे शिकत होता आणि त्यादरम्यान ही घटना घडली असल्याची माहिती समोर आलीय. बुटीबोरी पोलिसांनी तिन्ही तरुणांचे मृतदेह हे विहिरीबाहेर काढले असून, उत्तरीय तपासणीसाठी पाठवण्यात आलेत. मृतकांची नावेदेखील आता समोर आली असून, त्यात सूरज सिद्धार्थ चव्हाण, साजन सिद्धार्थ चव्हाण आणि संदीप चव्हाण यांचा समावेश आहे. तसेच मृतकांपैकी दोघे सख्खे भाऊ आहेत. खरं तर ही घटना काल रात्री ११ ते ११:३० दरम्यान बुटीबोरीमधील एमआयडीसी परिसरात घडलीय. तीन तरुण कारने जात असताना त्यांची कार ही थेट रस्त्यालगत असलेल्या कठडा नसलेल्या विहिरीत कोसळली आणि या घटनेत तिघांचा कारमध्ये अडकून बाहेर पडता न आल्यानं बुडून मृत्यू झालाय.

नागरिकांच्या मदतीने कार बाहेर काढली, पण... : घटनेची माहिती मिळताच रात्री उशिरा बुटीबोरी पोलीस आणि अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्याने नागरिकांच्या मदतीने अपघातग्रस्त कार विहिरीतून ओढून बाहेर काढली. मात्र, तोपर्यंत तिन्ही तरुणांचा मृत्यू झालाय, पुढील तपास बुटीबोरी पोलिसांनी सुरू केलाय.

असा आहे घटनाक्रम : सूरज सिद्धार्थ चव्हाण, साजन सिद्धार्थ चव्हाण आणि संदीप चव्हाण हे तिघे रात्री ११ वाजता कारने घराबाहेर पडले होते. तिघांपैकी एक जण कार शिकत होता. बालभारती मैदानाजवळ रात्रीच्या अंधारात त्यांना कठडा नसलेली विहीर दिसली नाही, त्यामुळे कार थेट विहिरीत जाऊन पडली. रात्री सुमारे साडे अकराच्या सुमारास बुट्टीबोरी पोलीस ठाण्याला माहिती समजली, बालभारती मैदानाजवळ असलेल्या विहिरीमध्ये एक कार पडलेली आहे. माहिती मिळाल्यानंतर लगेचचं पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले असता एक कार पाणी भरलेल्या स्थितीत विहिरीत पडलेली सापडली, त्यानंतर अग्निशामक दलाला घटनास्थळी पाचारण करण्यात आलंय. परंतु विहिरीमध्ये अधिक पाणी असल्यामुळे कार बाहेर काढण्यास अडथळा येत होता. त्यामुळे पंपाच्या साहाय्यानं विहिरीतील पाणी रिकामे केल्यानंतर कार बाहेर काढण्यात आली असता त्यामध्ये सूरज आणि साजन हे दोघे सख्खे भाऊ आणि त्यांचा मित्र संदीप चव्हाण यांचे मृतदेह बाहेर काढण्यात आलेत.

पान १ वरून...

## सामूहिक कॉपी आढळल्यास केंद्राची मान्यता रद्द करा

उपजिल्हाधिकारी यांची नियुक्ती करावी, अशा सूचना दिल्या.

**बुलढाण्यात बारावीच्या ३४,६३५ विद्यार्थ्यांची परीक्षा; ११६ परीक्षा केंद्र**

बुलढाण्यात बारावी परीक्षा आजपासून ते १८ मार्चपर्यंत होणार असून, ३४,६३५ विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जात आहे. तर दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्चदरम्यान होणार असून, ४०,१९४ विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत. जिल्ह्यात बारावीचे ११६ व दहावीचे १५९ परीक्षा केंद्र आहेत. ही परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी एक जिल्हास्तरिय तर १३ तालुक्यात प्रत्येकी एक भरारी पथक नेमण्यात आले आहेत. तसेच कायदा व सुरक्षा व्यवस्थेदृष्टीने परीक्षा केंद्रांवर गस्त घालण्यासाठी पोलीसांचे ३३ पथक आणि जिल्हा परिषद यंत्रणेचे २३ पथक नेमले आहेत. या परीक्षांवर कडक लक्ष देण्यात येत आहे. परीक्षा केंद्रात विद्यार्थ्यांना शांततेत देता यावी यासाठी कॉपामुक्त अभियान राबवले जात आहे. केंद्रावर कॉपी पुरविणाऱ्या पालक, अधिकारी, कर्मचारी आणि शिक्षकांवर कारवाई केली जाणार आहे. मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार बुलढाण्याच्या कॉपीमुक्त अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात असल्याचे प्र. जिल्हाधिकारी सदाशीव शेलार यांनी यावेळी सांगितले.

# अनाथ बालकांच्या पालकत्वासाठी प्रतिपालकत्व योजना

प्रत्येक बालकाला प्रेमळ कुटुंब मिळावे, हा त्याचा अधिकार आहे. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम आणि नियमांच्या तत्वानुसार प्रत्येक मुलाला घर मिळावे, कुटुंबात मुलांचे संगोपन व्हावे आणि अनाथालय, बालआश्रम, बालगृह, निरीक्षणगृह हे समाजातील दुर्लक्षित आणि देखभालीची आवश्यकता असणाऱ्या बालकांसाठी शेवटचा पर्याय असावा, हे कायद्याचे तत्व आहे. मात्र समाजातील अनेक बालके बेसहारा व निराश्रीत होऊन संस्थेत राहुन आपले जीवन जगत असतात. अशा बालकांना कौटुंबिक वातावरण मिळावे यासाठी प्रतिपालकत्व योजना राबविण्यात येत आहे.

केंद्र शासनाने बालकाची काळजी व संरक्षणासाठी बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ व सुधारित २०२१ कार्यान्वित केला आहे. या कायद्यातील कलम २ मध्ये विधीसंघर्षग्रस्त बालक आणि काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना यथासंभव त्यांना आवश्यक सुविधा पुरवून पुनर्वसनाद्वारे त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. या बालकांच्या पुनर्वसनाकरीता संस्थेंतर्गत आणि संस्थाबाह्य अशा दोन प्रकारे सुविधा पुरवून विकास करायचा प्रयत्न करण्यात येत आहे.

**अर्जदारांसाठी पात्रता**

अर्जदारांसाठी काही पात्रता निकष ठरविण्यात आले आहेत. त्यानुसार अर्जदार हे शारीरिक, मानसिक, भावनिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम असावेत, अर्जदारांना कोणतीही जीवघेणी वैद्यकीय स्थिती नसावी, अर्जदार हे कोणत्याही स्वरुपाच्या गुन्हेगारी कृत्यामध्ये किंवा कथितरित्या दोषी नसावे, विवाहित जोडप्याच्या बाबतीत दोन्ही जोडीदारांची संमती असणे आवश्यक आहे. एकल महिला ही मुलगा किंवा मुलगी दोन्ही पैकी कोणाचेही निवड करु शकते, परंतु एकल पुरुष फक्त मुलाची निवड करु शकतो. अर्जदार हे प्रेमळ, काळजी घेणारे आणि मुलाच्या वाढीसाठी फायदेशीर असे कौटुंबिक वातावरण तयार करण्यासाठी वचनबध्द असणे गरजेचे आहे.

मुलांचे पालनपोषण करण्यासाठी वयाचे निकष: सहा वर्षापेक्षा जास्त आणि १२ वर्षापर्यंतचे मुले असल्यास समिश्र विवाहित जोडी अर्जदारांचे किमान वय हे ७० वर्ष, तर एकल वय-३५ वर्ष असावे आणि कमाल वय ११० वर्ष, एकल वय -५५ वर्ष असावे. १२ वर्षापेक्षा जास्त आणि १८ वर्षापर्यंतचे



मुले असल्यास संमिश्र विवाहित जोडी अर्जदारांचे वय किमान ७० वर्ष, तर एकल वय ३५ वर्ष आणि कमाल ११५ वर्ष-एकल वय-६० वर्ष असावे. अर्ज कसा आणि कुठे करावा- मुलांचे संगोपन करण्यास इच्छुक पालकांनी लरीळपसी,लव.सीँ.ळप या ऑनलाईन पोर्टलवर नोंदणी करुन पालकांनी पोर्टलवरील मार्गदर्शक तत्वांच्या अनुसूची १ नुसार आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे.

**अर्ज केल्यानंतरची प्रक्रिया**

ऑनलाईन अर्ज केल्यानंतर सदर अर्ज हा जिल्हा बाल संरक्षण कक्ष यांचे पोर्टला दिसल्यानंतर अर्जाची पडताळणी होईल. सदर अर्जाची पडताळणी झाल्यानंतर जिल्हा बाल संरक्षण कक्षामार्फत नमुना ३० नुसार गृह अभ्यास अहवाल पूर्ण केला जाईल. गृह भेट अहवाल पोर्टलवर अपलोड केल्यानंतर अर्जदारांनी निवडलेल्या बालक किंवा बालिका यांची योग्यतेची शिफारस बाल कल्याण समिती, बुलढाणा यांच्याकडे करावी. सदर शिफारसी नंतर बाल कल्याण समिती मार्फत पालकांना बालक, बालिका पालनपोषणासाठी देण्यात येईल.

**पालनपोषणाचा कालावधी**

अल्पकालीन प्रायोजकत्वाचा कालावधी हा एक वर्ष असेल तर, दिर्घ कालवधी हा एक वर्षापेक्षा जास्त आणि पालक कुटुंबाशी मुलाच्या सुसंगततेच्या मुल्यांकनाच्या आधारे बालक, बालिका वयाच्या १८ वर्षापर्यंत ठेवता येईल.

**प्रायोजकत्वाची समाप्ती**

बाल कल्याण समिती, प्रायोजकत्व आणि प्रतिपालकत्व मंजुरी समितीची शिफारस आणि जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या अहवालावर विचार केल्यानंतर पालनपोषणाची नियुक्ती समाप्त करण्याचा अधिकार राहील.

**कायमस्वरुपी दत्तक विधान**

अर्जदारांनी प्रतिपालकत्व योजनेअंतर्गत जर बालक, बालिका पालनपोषणासाठी घेतलेले असेल आणि पालकांच्या काळजीच्या कालावधीत मुलांचे पालनपोषण कुटुंबासोबत चांगल्याप्रकारे जुळवुन घेतलेल्या प्रकरणांमध्ये आणि पालक कुटुंब व पालनपोषणासाठी असलेले बालक, बालिका दोघेही दोन वर्षाच्या कालावधीनंतर दत्तक घेण्यास पात्र असु शकतात.

अधिक माहितीसाठी जिल्हा बाल संरक्षण कक्ष, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, बस स्टँड मागे, मुट्ठे ले आऊट, डॉ जोशी नेत्रालय, बुलढाणा येथे किंवा दुरध्वनी क्रमांक ०२७६२-२९९३६६, dcpubuldanagmail.com या मेलवर संपर्क साधावा.

: संकलन :
**सतिश आनंदराव बगमारे,**
माहिती सहायक,
जिल्हा माहिती कार्यालय, बुलढाणा

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### शिवकुमार शर्मा यांच्या मारेकऱ्याला खारघर पोलिसांनी केली अटक, खारघर पोलीस ठाण्यातून पनवेल कोर्टात आणले





दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** खारघर, मुंबई येथे ओव्हरटेक करण्यावरून झालेल्या वादातून शिवकुमार शर्मा या व्यक्तीची हत्या करणाऱ्या आरोपीला खारघर पोलिसांनी अटक केली आहे. अनेक दिवसांपासून पोलीस आरोपींना पकडण्यासाठी प्रयत्न करत होते. आता एका आरोपीला अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे, तर दुसरा आरोपी अद्याप फरार आहे. दरम्यान, महाराष्ट्राचे मंत्री नितीश राणे यांनीही पीडितेच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांना न्याय मिळवून देण्याचे आश्र्वासन दिले. भाजप नेते किरीट सोमय्या यांनी कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर तबलीकी जमातच्या लोकांनी आरोपींना वाचवल्याचा आरोप केला होता. तर या प्रकरणात आरोपीला खारघर पोलीस ठाण्यातून पनवेल कोर्टात आणले आहे. पोलीस थोड्याच वेळात आरोपीला कोर्टात करणार हजर करणार आहेत. अधिक तपासासाठी १४ दिवसांची पोलीस कोठडी मागितली जाण्याची माहिती आहे तर घटनेचा एक आरोपी अजूनही फरार आहे.

### दिव्यांग बांधव व अनाथ बालकांसह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी घेतले 'श्रीं'चे दर्शन







दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** राज्याचे गृह(ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनिकर्म राज्यमंत्री डॅा.पंकज भोयर हे आज मंगळवारी बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना त्यांनी दिव्यांग बांधव तसेच अनाथ बालकांसह शेगांव येथे श्री संत गजानन महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. राज्यमंत्री डॅा.भोयर यांनी श्री गजानन महाराज संस्थानचा आढावा यावेळी घेतला. तसेच वर्धा जिल्ह्यातून आलेल्या दीडशे दिव्यांग बांधव तसेच अनाथ बालकांना दर्शन घडवून दिले. तसेच त्यांच्यासोबत महाप्रसादाचा लाभही त्यांनी घेतला. संस्थानच्या वतीने त्यांचे सपत्नीक यथोचित स्वागत सत्कार करण्यात आले. यावेळी त्यांच्यासोबत जिल्हा निबंधक नानासाहेब, उपशिक्षणाधिकारी (मा) आशिष वाघ, उपशिक्षणाधिकारी (प्रा) अनिल देवकर, सहायक कार्यक्रम अधिकारी मंगेश भोरसे,गटशिक्षणाधिकारी श्रद्धा वायदंडे आदी उपस्थित होते.

### रणवीर अलाहबादियाच्या अडचणीत वाढ, मुंबई पोलीसांची धडाकेबाज कारवाई

**मुंबई/प्रतिनिधी :** इंडियाज गॉट लेटेंट या शोमध्ये केलेल्या वादग्रस्त विधानानंतर रणवीर अलाहबादियाच्या अडचणीत वाढ झाली आहे. या वादाच्या संदर्भात जनतेच्या संतापाच्या पार्श्र्वभूमीवर, मुंबई पोलिसांनी युट्यूबर रणवीरला समन्स बजावलं आहे. रणवीर अलाहाबादियानं केलेल्या वादग्रस्त विधानानंतर देशभर सोशल मीडियामध्ये संतापाची लाट पाहायला मिळाली. यानंतर महाराष्ट्र राज्य सरकारनंही कारवाईचा बडगा उचलण्याचा निर्णय घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधितांवर कारवाई करण्याचं आश्वासन दिल्यानंतर मुंबई पोलिसांनी आपली कारवाई तीव्र केली. अखेर रणवीर अलाहाबादियाला समन्स बजावण्यात आले आहे. त्याच्या व्हर्सोवाच्या घरी मुंबई पोलिसांनी त्याला समन्स बजावल्याचे समजतेय. या प्रकरणी तपास करणाऱ्या अधिकाऱ्यांसमोर हजर राहून स्पष्टीकरण देण्याची जबाबदारी आता पॉडकास्टर रणवीर अलाहाबादियाची असेल. दरम्यान समय रैनालाही मुंबई पोलिसांच्या चौकशीचा सामना करावा लागणार आहे.

# शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयातील तासिका तत्त्वावरील अधिव्याख्यात्यांचे मानधन देण्यात यावे

## उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांचे निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील सरकारी पॉलिटेक्निक महाविद्यालयांमध्ये तासिका तत्त्वावर असलेल्या अधिव्याख्यात्यांचे मानधन वेळेत देता येईल असे नियोजन तंत्र शिक्षण संचालनालय यांनी करावे ,असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले आहेत.

आज मंत्रालयात उच्च व तंत्र शिक्षणमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय तंत्रनिकेतनांमधील तासिक तत्वावरील अभ्यागत अधिव्याख्यात्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.या



बैठकीला माजी मंत्री तथा आमदार संजय बनसोडे,आमदार अभिमन्यू पवार, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी.वेणुगोपाल रेड्डी, तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ.विनोद मोहितकर, राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे संचालक डॉ.प्रमोद नाईक व अधिकारी उपस्थित होते.

मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये कायमस्वरूपी अध्यापकांच्या बरोबरीने अनेक अभ्यागत अधिव्याख्याते तासिका तत्वावर कार्यरत आहेत. या अधिव्याख्यात्यांना सैद्धांतिक (थिअरी) तासासाठी रुपये ८०० आणि प्रात्यक्षिक तासासाठी रुपये ४०० याप्रमाणे मानधन दिले जाते.याबाबत महाविद्यालयांनी तासिका तत्वावर असणाऱ्या अधिव्याख्यात्यांना दरमहा मानधन मिळेल असे नियोजन करावे.

मा. न्यायालयाने तासिका तत्वावर अध्यपकांच्या नियुक्ती करण्यास स्थगिती दिली आहे. वाढती विद्यार्थी संख्याआणि नवीन अभ्यासक्रम याचा विचार करून राज्यातील सरकारी तंत्रनिकेतन, अधिव्याखात्यांची कमतरता असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणीक अभ्यासक्रमावर आणि गुंणवतेवर परिणाम होत असल्याच्या तक्रारी राज्य शासनाकडे येत आहेत. यासंदर्भात मा.न्यायालयात राज्य शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्यात येईल.असेही मंत्री श्री.पाटील यांनी यावेळी सांगितले.

## सेन्सेक्स ११०० अंकांनी कोसळला; गुंतवणूकदारांचे १० लाख कोटी गायब, बाजार कोसळण्याची काय कारणे आहेत?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या आठवड्यापासून शेअर बाजारात गुंतवणूकदारांमध्ये निरुत्साह दिसत असून त्याचा परिणाम सेन्सेक्स आणि निफ्टीच्या घसरणीमध्ये दिसत आहे. सोमवारी सेन्सेक्स आणि निफ्टीने गटांगळी खाल्लानंतर मंगळवारीही बाजाराची सुरुवात निराशाजनक झालेली दिसली. बीएसई सेन्सेक्स आज १,१०६ अंशांनी कोसळला. १.४३ टक्क्यांच्या घसरणीसह सेन्सेक्सने ७६,२०५.५२ चा तळ गाठला. तर निफ्टी५० मध्ये ३४९ अंशानी घसरण पाहायला मिळाली. दुपारी १.३० च्या आसपास निफ्टी५० निर्देशांक २३,०३२ वर घसरला.



व्यापक बाजारात मिड कॅप आणि स्मॉल कॅप निर्देशांकात अनुक्रमे ३.५ टक्के आणि ३.९ टक्के इतकी घसरण झाली. बीएसईवर सूचीबद्ध असलेल्या कंपन्यांचे बाजारमूल्य आज ९.८७ लाख कोटींनी घटून ते ४०७.८५ लाख कोटींवर पोहोचले. एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक आणि कोटक महिंद्रा बँकेच्या शेअर्समध्ये सर्वाधिक घसरण पाहायला मिळाली. हे शेअर्स ३ टक्क्यांनी घसरले. सेन्सेक्सच्या उतरत्या कळीला या क्षेत्राने २७० अंशाचा हातभार लावला.

शेअर बाजार आज का घसरला?

१) अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी स्टिल आणि अल्युमिनियम धातूवरील आयात शुल्क कोणताही अपवाद किंवा सूट न देता २५ टक्क्यांनी वाढवले. नवे आयात शुल्क दर ४ मार्च पासून लागू केले जातील, असे व्हाइट हाऊसमधील अधिकाऱ्यांनी जाहीर केले आहे. कॅनडा, ब्राझील, मेक्सिको, दक्षिण कोरिया आणि इतर देशातून आयात होणाऱ्या धातूवर हा कर लावला जाणार आहे.

२) अमेरिकन फेडरल रिझर्व्ह चे अध्यक्ष जेरोम पॉवेल हे अमेरिकन संसदेत बँक, गृह आणि शहर व्यवहार समितीसमोर निवेदन करणार आहेत. आयात शुल्क आणि महागाईबाबत ते काय बोलतात, याकडेही गुंतवणूकदारांचे लक्ष लागले आहे.

३) एनएसडीएलच्या आकडेवारीनुसार, विदेशी वित्त संस्थांनी या वर्षात ९.९४ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक भारतीय बाजारातून काढून घेतली आहे. त्याचाही फटका बाजाराला बसला आहे.

## ध्येय, नियोजन आणि सातत्य हा यशाचा मूलमंत्र . प्राचार्य - डॉ. वरकड



दैनिक आपला विदर्भ

■ मनोज गोरे

**चंद्रपूर :** विदर्भ कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स जिवती तसेच गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांच्या विद्यार्थी विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने विदर्भ महाविद्यालय जिवती येथे तीन दिवसीय व्यक्तिमत्व विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या तीन दिवसीय शिबिराच्या निमित्ताने वेगवेगळ्या मान्यवरांचे मौलिक विचार विद्यार्थ्यांना त्यांच्या आयुष्यात वेगळी कलाटणी देण्यास कारणीभूत ठरतील या उद्देशाने प्रतिपादन करण्यात आले. पहिल्या दिवसाच्या सत्रात डॉ.देव प्राचार्य म. गांधी विद्यालय गडचांदूर तसेच प्रा. बांद्रे ग्रंथपाल म. गांधी महाविद्यालय गडचांदुर यांनी तर दुसऱ्या दिवशीच्या सत्रात मा. कांचन पांडे पोलीस निरीक्षक जिवती, मा.डूडूले साहेब वैद्यकीय अधिकारी जिवती उपस्थित होते.तर अंतिम दिवसाच्या सत्रात डॉ. एस एम वरकड प्राचार्य शिवाजी महाविद्यालय राजुरा आणि स्मिता चिताडे मॅडम माजी प्राचार्य म.गांधी क.महाविद्यालय गडचांदुर यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने सखोल असे बौद्धीक मार्गदर्शन विद्यार्थ्यांना देण्यात आले.

डॉ. वरकड यांनी आपल्या प्रमुख मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी करियर निवडत असतांना आपल्या सोयीनुसार करिअरची निवड करणे निश्र्चित ध्येय गाठण्यासाठी त्याचे नियोजन करून, त्या नियोजनात सातत्य राखून जर प्रयत्न केला तर यश हमखास प्राप्त होतील. आपला यशाचा मार्ग कोणीही रोखू शकत नाही असे मत डॉ. वरकड यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांसमोर मांडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष डॉ. शाक्य मॅडम यांनी ग्रामीण भागात वास्तव्यास असलेल्या विदर्भ महाविद्यालय हे परिसरातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासा करिता कटिबध्द असुन त्यांच्या उज्वल भविष्यासाठी त्यांच्या ध्येयपूर्तीसाठी सदैव सोबत राहील असे प्रेरणादायी विचार मांडले. याप्रसंगी मंचावर डॉ. गजानन राऊत, डॉ. श्रीकांत पानघाटे, प्रा. लांडगे उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे संचालन डॉ. परवेज अली तर आभार डॉ. योगेश खेडेकर यानी मानले. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने प्रा. सचिन शिंदे यांनी उत्तम रीतीने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

# शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी केली परीक्षा केंद्राची पाहणी

## शेगांव येथील बुरुंगले महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्राला दिली भेट





दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** इयत्ता बारावीची परीक्षा सुरु झाली असून राज्याचे शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांना आज बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर असतांना शेगाव येथील श्री ज्ञानेश्र्वर मस्कुजी बुरुंगले कला व विज्ञान कनिष् महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्राला भेट देऊन परीक्षा प्रक्रियेची पाहणी केली.

या भेटीच्या वेळी भारतीय संस्कृतीप्रमाणे प्राचार्या मीनाक्षीताई बुरूंगले व पर्यवेक्षक शिवाजी निळे यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे सत्कार केले. यावेळी आशिष वाघ उपशिक्षणाधिकारी (मा), अनिल देवकर, उपशिक्षणाधिकारी (प्रा),गटशिक्षणाधिकारी श्रद्धा वायदंडे, योगीराज फाउंडेशनचे सचिव डॉ. श्यामकुमार बुरूंगले, श्रीधर पाटील आणि सोबत इतर अधिकारी, पत्रकार, प्राध्यापक व शिक्षक उपस्थित होते.

आजपासून इयत्ता बारावीची परीक्षा सुरु झाली असून राज्यभरात कॉपीमुक्त अभियान राबविण्यात येत आहे. यादृष्टीने परीक्षा केंद्रांवर कॉपीमुक्त परीक्षा राबविली जात आहे का याची पाहणी करण्यासाठी राज्यमंत्री पंकज भोयर यांनी ही भेट दिली.

या पाहणी दरम्यान त्यांनी राज्यात आजपासून सुरू झालेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षा व कॉपीमुक्त अभियानासंदर्भात माहिती दिली. याशिवाय विद्यार्थ्यांनी शांततेत परीक्षा द्यावी. तसेच परीक्षा केंद्रातील अधिकारी, कर्मचारी, शिक्षक आणि पालकांनी कॉपीमुक्त अभियात सहभागी होवून सहकार्य करण्याचे आवाहन केले.

# संवेदना प्रतिष्ठान महिला ग्रुपच्यावतीने बौद्ध वधू वर परिचय मेळावा संपन्न

## मेळाव्याला राज्यभरातून उत्तम प्रतिसाद..

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** गेल्या पाच वर्षांपासून संवेदना प्रतिष्ठांन् च्या वतीने जिल्ह्यातील विविध तालुक्यात बौद्ध वधू वर परिचय मेळावे घेण्यात आले आहेत.. या परिचय मेळाव्यातून असंख्य वधू वर यांचे विवाह सुद्धा पार पडले आहेत... यावर्षी सुद्धा त्यागमूर्ती माता रमाई यांच्या जयंतीचे औचित्य साधून संवेदना प्रतिष्ठान महिला ग्रुप च्या वतीने बुलढण्यातील सामाजिक न्याय भवन येथे बौद्ध समाजातील वधू वर परिचय मेळावा घेण्यात आला...

या मेळाव्याचे अध्यक्ष पत्रकार संजय जाधव हे होते तर उदघाटक रजनीताई क्षीरसागर, सौ लता जाधव, सौ तेजकला कंकाळ , सविता मोरे, सुशीला आराख




ह्या होत्या..

या मेळाव्याला राज्यभरातून असंख्य वधू वर व त्यांचे पालक वर्ग उपस्थित झाले होते.. सर्व वधू वर यांनी आपला सविस्तर परिचय दिला.. तर काहिनी याचं मेळाव्यात आप आपला जोडीदार निवडून पुढील कार्य सुद्धा पाडण्यास सुरुवात केली ..

आजकाल स्पर्धेच्या युगात मुला मुलींचे वय वाढत चालले आहे .. त्यामुळे त्यांचे विवाह सोहळे वेळेवर व्हावेत याच उद्देशाने हा बौद्ध समाजातील वधू वर परिचय मेळावा घेण्यात आला..

उदघाटणीय प्रसंगी रजनीताई क्षीरसागर , तेजकला कंकाळ, व मोरे ताई यांनी आपलापले मनोगत व्यक्त केले... तर असे वधू वर परिचय मेळावे का घेण्यात येत आहे पूर्वी का घेतले जात नव्हते.. आजची परिस्थिती का बदलली.. यावर सविस्तर प्रकाश कार्यक्रमाचे अध्यक्ष संजय जाधव यांनी टाकला... तसेच प्रास्ताविक नंदकिशोर खोडके यांनी केले या मेळाव्याचे उत्कृष्ट संचालन मनोहर मोरे यांनी केले तर मेलाव्याच्या यशस्वीतेसाठी संवेदना प्रतिष्ठान् चे सदस्य लक्ष्मण कंकाळ, चंद्रकांत आराख, प्रभाकर गवई , कैलास मोरे, राजाराम गवई , प्रकाश जाधव, कुमार क्षीरसागर, वसंत सरदार, प्रशांत इंगळे, विलास बनसोड, भीमराव इंगळे, मानिकराव गवई , यांच्यासह प्रतिष्ठान चे सर्व सदस्यांनी प्रयत्न केले...

# कोट्यवधी रुपयाचे काम अर्धवट अंजनीवासीयांना पाणी टंचाईचे चटके



## लांडेवाडी येथील जलजीवन मिशनची योजना झाली पास;गावकऱ्यांना नाही पाण्याचा वास..

- अधिकारी, ठेकेदार साहेब कधी करणार यांचा अभ्यास
- लांडेवाडीतील जलजीवन मिशनचे काम रखडलेलेच
- नागरिकांची पाण्याची समस्या कायम
- अधिकारी, पदाधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

भाग ०६


दैनिक आपला विदर्भ

मेहकर - मेहकर तालुक्यातील अंजनी बुद्रुक मधील एक भाग असलेल्या लांडेवाडी गावातील जलजीवन मिशनच्या कामासाठी २० लाख १५ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता.या निधी अंतर्गत कामास प्रारंभही करण्यात आला. मात्र,नंतर काम करण्यात न आल्याने गेल्या दोन वर्षापासून ...

तालुक्यातील अंजनी बुद्रुक हे मोठे व राजकीय दृष्ट्या महत्त्वाचे गाव आहे. छत्रपती संभाजी नगर हायवेवर असलेल्या या गावाचा विस्तार झपाट्याने झाला आहे. वाढत्या लोकसंख्ये बरोबर त्यांना आवश्यक असलेल्या सुविधा निर्माण व्हाव्या, पिण्याच्या पाण्याची समस्या दूर व्हावी, यासाठी शासनाने जलजीवन मिशन अंतर्गत तब्बल २० लाख १५ हजार रुपयांचा निधी मंजूर करून अंजनी बुद्रुक मधील एक भाग असलेल्या लांडेवाडीसाठी जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेतला.सदर कामास २८ ऑक्टोबर २०२२ रोजी तांत्रिक मान्यता मिळाली. ७ नोव्हेंबर २०२२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली. तर २० डिसेंबर २०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला. त्यानंतर सदर काम सुरू करण्यात आले. मात्र केवळ पाच टक्के काम झाल्यानंतर सदर काम हे बंद पडल्याने गेल्या दोन वर्षानंतरही पूर्णत्वास नेण्यात आले नाही.सध्या स्थितीत सदर कामासाठी कार्यारंभ आदेश प्राप्त असून बालाजी बिल्डर्स अँड डेव्हलपर्स (जितू सावजी) या कंत्राटदारामार्फत सदर काम करण्यास प्रारंभ करण्यात आला होता. मात्र,अधिकारी-पदाधिकाऱ्यांच्या निष्काळापणामुळे रखडलेले काम पुन्हा सुरु न केल्याने लांडेवाडी भागातील पाणी समस्या कायम आहे. शासन लाखो रुपये खर्च करून सुविधा देण्यासाठी प्रयत्न करीत असताना अधिकारी पदाधिकाऱ्यांच्या दुर्लक्षित व निष्काळजीपणाच्या धोरणामुळे सर्वसामान्य नागरिकांना मात्र पिण्याच्या पाण्यासारख्या गंभीर समस्येला सामोरे जावे लागत आहे.परिणामी अधिकारी पदाधिकाऱ्यांच्या विरोधात सर्वसामान्य नागरिकांमध्ये तीव्र रोष व्यक्त केला जात आहे.याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन लांडेवाडी भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून होत आहे.

देविदास खनपटे
मुख्य संपादक

काम पूर्णत्वास नेण्याबाबत लोकप्रतिनिधींची चुप्पी





दैनिक आपला विदर्भ

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 175 ■ बुधवार, दि. 05 फेब्रुवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

### जल जीवन मिशनचे भ्रष्टाचाराचे केंद्र मेहकर : आ. सिद्धार्थ खरात

भाग ०४

जलजीवन मिशनच्या कामाच्या चौकशीचा केवळ फार्स

आमदार सिद्धार्थ खरात यांचा आरोप कोणत्याही प्रकारची चौकशी झाली नसल्याची स्पष्टोक्ती

जलजीवन मिशनचे भ्रष्टाचाराचे केंद्र मेहकर

### कोट्यावधी रुपयांच्या कामाला भ्रष्टाचाराची वाळवी?

चौकशी थंडबस्त्यात

तालुक्यातील जलजीवन मिशनचे काम अर्धवट

भाग ३

### कोट्यावधी रुपये पाण्यात; डोणगाव तहानलेलेच

जनतेच्या नावावर शासकीय निधीची उधळपट्टी

बारा कोटी पाण्यात गेल्यानंतर आता तब्बल २१ कोटीची तरतूद : पाणी मिळेल की नाही याची शाश्वती नाही

जलजीवन मिशनच्या कामाचा अहवाल मागितला आहे

काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित विभागाची : दिपक तांबारे

## ग्रामस्थांच्या तक्रारीला अधिकाऱ्याची केराची टोपली

## ग्रामस्थांमध्ये प्रशासनाप्रती तीव्र रोष

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर : तालुक्यातील अंजनी बुद्रुक हे येथील पाणीटंचाई निवारण्यासाठी शासनाने दोन वर्षांपूर्वी जल जीवन मिशन अंतर्गत तब्बल पाच कोटी रुपयांचा निधी खर्च करून कामास प्रारंभ केला होता. मात्र, सदर काम हे अद्यापही पूर्ण झाले नाही. त्यामुळे अंजनी बुद्रुक वाशी यांना पाणीटंचाईच्या भीषण समस्येला सामोरे जावे लागत आहे.कोट्यावधीचा निधी खर्च करून काम अपूर्ण राहिले असल्याने ग्रामस्थांना पाणी टचाईचे चटके सोसावे लागत आहेत. याकडे आपण लक्ष देऊन येथील पाणीटंचाई निवारण्यासाठी उपाययोजना करावी, अशी मागणी अंजनी बु. येथील ग्राम पंचायतच्या वतीने बुलढाणा जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे केली आहे. सदर निवेदनाला एक वर्षाचा कालावधी होत असतानाही अधिकाऱ्यांनी या निवेदनाची दखल न घेतल्याने ग्रामस्थांमध्ये प्रशासनाप्रति तीव्र रोष व्यक्त केला जात आहे.**






अंजनी बुद्रुक. हे पाच हजार लोकसंख्येचे वर गाव असुन सदर गावात जल-जीवन मिशन योजनेचे काम निकृष्ठ झाल्यामुळे याबाबत उपअभियंता, कार्यकारी अभियंता, व बुलढाणा ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, मेहकर व बुलडाणा यांना वेळोवेळी तक्रारीच्या माध्यमातून कळविले आहे, परंतु, त्याची दखल घेण्यात आली नाही. अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षित धोरणामुळे यापूर्वी राबविण्यात आलेल्या जलस्वराज, महाजल या योजनेचा बट्ट्याबोळ झाला. तसेच काही जल-जीवन मिशनचे होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विहीरीचे काम अर्धवट ठेवले आहे. पाण्याची टाकी बांधकाम अपूर्ण आहे. गावातील वितरण व्यवस्था निकृष्ट पाईप वापरुन ती अपूर्णच आहे. खोदलेले रस्त्यावर सिमेंट टाकलेले नाही. नवीन जन-जीवन मिशनच्या विहिरीस चांगले पाणी लागले असुन त्या विहीरीपासून जुन्या नळयोजनेच्या विहिरीचे अंतर दीड किलोमीटर असुन त्या विहिरीपर्यंत तात्पुरती पूरक नळयोजना केल्यास गावातील पाणीटंचाई दूर व्होण्यास मदत होणार आहे. गावातील पाणीटंचाईमुळे वाद-विवाद वाढले आहेत. पाणीटंचाईतून अनुचित प्रकार घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्याचबरोबर ग्रामसभेतही ग्रामस्थांनी वाद घालून गोंधळ केलेला आहे.याकडे त्यामुळे याकडे संबंधित विभागाने तत्काळ लक्ष देऊन उपाययोजना कराव्या, अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने गतवर्षी करण्यात आली होती. मात्र, एका वर्षानंतरही ग्रामस्थांच्या मागणीची दखल न घेता कोणत्याही प्रकारची उपाययोजना करण्यात आल्या नाही.त्यामुळे अधिकारी वर्गच शासकीय निधी लाटत असल्याचा आरोप ग्रामस्थ करीत आहेत.




देविदास खनपटे
मुख्य संपादक

# शेगाव तालुक्यातील केस गळतीचे लोण आता खामगाव तालुक्यात!

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव तालुक्यातील केस गळतीच्या घटनेनंतर आता खामगाव तालुक्यातील जयपुर लांडे या गावात एका कुटुंबातील मायलेकाची केस गळती सुरू झाली आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबतची माहिती मिळताच तालुका आरोग्य प्रशासनाच्या चमूने त्यांच्या घरी जाऊन केसांचे नमुने घेतले असून, त्यांच्यावर औषधोपचार करण्यात आला आहे. तर शेगाव तालुक्यातील केस बाधित गावातील पाहुणे या कुटुंबाच्या घरी आले होते. त्यांच्या संसर्गामुळे हा प्रकार घडला की काय, याबाबतही तपास करण्यात येत आहे. दरम्यान इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च या संस्थेने रेशनच्या धान्यामुळे केस गळती झाल्याचा प्राथमिक अहवाल सादर केल्याची माहिती मिळाली आहे. मात्र, अजूनही केस गळतीचे अचूक निदान झाले नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



## सोशल मीडिया आणि ओटीटी प्लॅटफॉर्मसाठी कठोर कायदा करा

**ठाणे/प्रतिनिधी :** सोशल मीडिया, डिजिटल मीडिया आणि ओटीटी प्लॅटफॉर्मवर सध्या अलितेचा कहर सुरु आहे. अभिव्यक्ती स्वातंर्त्याच्या नावाखाली रोज नविन बेताल वक्तव्य केली जात आहेत. अशा घटनांमुळे भारतीय संस्कृती बदनाम होत आहे. सोशल मीडिया, ओटीटी प्लॅफॉर्मसाठी माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाकडून मार्गदर्शक तत्वे जारी केली असली तरी आता या माध्यमांना लगाम लावण्यासाठी कठोर कायदा करावा, अशी मागणी आज ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांनी संसदेत शून्य प्रहर दरम्यान केली. खासदार नरेश म्हस्के यांच्या या मागणीला सर्वपक्षीय खासदारांनी पाठिंबा दर्शविला. युट्यूबवरील एका कार्यक्रमात यूट्युबर रणवीर अलाहाबादिया याने आई आणि वडिलांसंदर्भात अतिशय अश्लाघ्य भाषेत संवाद साधला आहे.

## मोताळा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिल्पनिर्देशक पदाची भरती

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** सेवागिरी बाबा शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोताळा येथे ठोक मानधनावर निदेशक पदासाठी अर्ज मागविण्यात आले आहे. इच्छुक अर्हताधारक उमेदवारांनी आपल्या शैक्षणिक प्रमाणपत्राच्या मुळ प्रतिसह स्वखर्चाने दि. १७ फेब्रुवारी रोजी उपस्थित राहावे, असे आवाहन सेवागिरी बाबा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थाचे प्राचार्य एस.डी.गगावणे यांनी केले आहे.

आयएमसी अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी निव्वळ तात्पुरत्या मानधानावर १४ हजार रुपये प्रतिमाह प्रमाणे नव्याने संलग्नता प्राप्त झालेल्या व्यवसायाच्या रिक्त असलेले निदेशक पदे भरावयाची आहेत. इच्छुक अर्हताधारक उमेदवारांनी आपल्या शैक्षणिक प्रमाणपत्राच्या मुळ प्रतिसह स्वखर्चाने दि. १७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता मुलाखतीसाठी सेवागिरी बाबा शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोताळा मलकापुर रोड, जि. बुलढाणा येथे उपस्थित राहावे. सबंधित शाखेतील अभियांत्रिकी पदवी, पदविका, आयटीआय पास व अनुभव असल्यास प्राधान्य राहील. पदासंदर्भातील अटीशर्ती व सविस्तर माहिती https://dgt.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## बनावट नोटा संदर्भात ठाणेदार घुगे यांच्यावर कारवाई करा अन्यथा आत्मदहन आंदोलन

### गजानन बोरकर यांचा पोलीस अधीक्षकांना निवेदनाद्वारे इशारा



दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** बनावट नोटा संदर्भात ठाणेदार घुगे यांच्यावर कारवाई करावी, अन्यथा अमरावती आयुक्तालय हद्दीतील टॉवरवर चढून आंदोलन अथवा मंत्रालय येथे आत्मदहन करण्यात येईल, असा इशारा यशवंत सेनेच बुलढाणा संपर्क प्रमुख गजानन माधव बोरकर यांनी बुलढाणा पोलीस अधीक्षक यांना ११ फेब्रुवारी रोजी निवेदनाद्वारे दिला आहे..

पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनात नमुद केले आहे. की, मेहकर पीलीस स्टेशन हद्दीमध्ये झालेल्या बनावट नोटा प्रकरणातील गुन्ह्याच्या चौकशीमध्ये विविध प्रकारच्या तफावत व गैरजबाबदारी आढळून आलेल्या आहेत. सदर प्रकरणाच्या अनुषंगाने १० जानेवारी रोजी आपल्या कार्यालयात संबंधित तक्रार अर्ज सबळ पुराव्यानिशी दिला आहे. तसेच भ्रमणध्वनी वरून सुद्धा आपल्या सोबत बोलणे झाले आहे.

मेहकर उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील यांनी याप्रकरणी चौकशी करून संबंधित अहवाल आपल्या कार्यालया समक्ष सादर करण्यात आला आहे. सदर प्रकरणात पोलीस आयुक्त अमरावती गृहमंत्री मुंबई यांच्याकडे सुद्धा लेखी तक्रार करण्यात आलेली आहे. आपण दिलेल्या आश्र्वासनानुसार २६ जानेवारी रोजी करण्यात येणारे आंदोलन तात्पुरते स्थगित केले होते.परंतु, कारवाई करण्यास आपल्या कार्यालयाकडून दिरंगाई होत करण्यात येत आहे.

तरी,मेहकर पोलीस स्टेशनचे ठाणेदार घुगे यांच्यावर कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी कारवाई करावी, अन्यथा अमरावती आयुक्तालय हद्दीमध्ये टॉवरवर पडून आदोलन करण्यात येईल, अथवा मंत्रालय परिसरात आत्मदहन करण्यात येईल, याप्रकरणी सर्वस्वी जबाबदार गृह विभाग असेल.असा इशारा यशवंत सेनेच बुलढाणा संपर्क प्रमुख गजानन माधव बोरकर यांनी बुलढाणा पोलीस अधीक्षक यांना ११ फेब्रुवारी रोजी निवेदनाद्वारे दिला आहे.

# सुरक्षित इंटरनेट वापराविषयी जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यशाळा

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** इंटरनेटच्या सुरक्षित आणि जबाबदार वापरासाठी, विशेषतः मुले, महिला आणि तरुणांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी साजरा केला जाणाऱ्या सुरक्षित इंटरनेट दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांचा कार्यशाळा घेण्यात आली.




दरवर्षीप्रमाणे फेब्रुवारीच्या दुसऱ्या मंगळवारी जगभरात सुरक्षित इंटरनेट दिवस पाळला जातो. यावर्षी ११ फेब्रुवारी रोजी टूगेदर फॉर अ बेटर इंटरनेट या संकल्पनेअंतर्गत हा दिवस साजरा करण्यात आला.

या कार्यशाळेला निवासी उपजिल्हाधिकारी डॉ जयश्री ठाकरे, उपजिल्हाधिकारी (महसूल) समाधान गायकवाड, उपजिल्हाधिकारी अजिंक्य गोडगे, अजित जंगम, जिल्हा माहिती तंत्रज्ञान अधिकारी सुनील खुले यांचे सह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय ११ फेब्रुवारीपासून, एक देशव्यापी जागरूकता मोहीम सुरु करत आहे. केंद्र सरकारच्या माहिती सुरक्षा आणि शिक्षण जागरुकता प्रकल्पांतर्गत आयोजित या उपक्रमाच्या माध्यमातून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इंटरनेट वापरकर्त्यां अधिकारी, कर्मचाऱ्यांना सुरक्षित ऑनलाइन पद्धती, सायबर स्वच्छता, प्रमुख सायबर धोके, आणि इंटरनेट स्ट्रॅटेजीज याबाबत माहिती देण्यात आली. यासह इंटरनेटचे फायदे व तोटे, सायबर फ्रॅाड, फिशिंग, स्मिशिंग, डिजिटल अरेस्ट, ानलाईन फसवणुकीपासून बचाव आदी महत्त्वपूर्ण माहिती सुनील खुले यांनी या कार्यशाळेत दिली.

जिल्हा माहिती तंत्रज्ञान अधिकारी सुनील खुले यांनी यावेळी सादरीकरण करुन सुरक्षित इंटरनेट वापराबाबत माहिती दिली.